<u>नि.फौ.ख.क्रं. ९३/२०१०</u> <u>निशाणी क्र. २० पुढे</u>

<u>शासन .वि. वासुदेव वानखेडे</u>

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०५</u>**

.......

**माझे नांव** – प्रमोद पंजाबराव बिजवार

**वय** – ५२ वर्षे, धंदा – मजूरी,

**राहणार** – जुनोना, तालुका–सेलू, जि. वर्धा.

.......

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ के.डब्लू.मगरे यांच्या मार्फत उलटतपास शपथेवर सुरु</u>**

३. आरोपीने गजानन आगलावे यांना शेती विक्री केल्याचे खरेदीखत मी पाहिले नाही. मला सदरील शेतीचा गट क्रमांक व इतर तपशील ही माहित नाही. गजानन आगलावे यांच्या सदर शेताबाबतच्या ताब्याबाबतचा दस्ताऐवज मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.11.01 16:00:53 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

<u>दिनांक</u> : ०१/११/२०२५

**<u>नि.फौ.ख.क्रं. ९३/२०१०</u>** **<u>निशाणी क्र. २१ पुढे</u>**
**<u>शासन .वि. वासुदेव वानखेडे</u>**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०६</u>**

.......

**माझे नांव** – विठ्ठल केदारजी वैद्य
**वय** – ६५ वर्षे, धंदा – शेती,
**राहणार** – देउळगांव, तालुका–सेलू, जि. वर्धा.

.......

**<u>सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत पुढील जादाचा सरतपास शपथेवर सुरु:</u>**

१. माझे समक्ष भोयर या पटवारीचे सहीचे व तीन शिक्क्यांचे कागदावरील नमुने जप्त केले होते. पंचनामा करतेवेळी माझे सोबत दुसरे पंच हजर होते. सदरील नमुना एस–२ वर माझी सही आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**
**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ के.डब्लू.मगरे यांच्या मार्फत:</u>**

२. न्यायालयात सदरील तीन शिक्के मला दाखविले होते की नाही हे मला आठवत नाही. माझ्या समक्ष पोलीसांनी सदरील शिक्के जप्त केले की नाही हे मला आता आठवत नाही. मी तीन कागदावर १८ सह्या केले होते. याबाबत मला आठवत नाही की, त्यावेळी तेथे भोयर पटवारी हजर होते की नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष पटवारीची ओळख करुन घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे समक्ष कोणत्याही कागदावरील शिक्के मारले नाही व जप्त केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.11.01 16:00:59 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**<u>दिनांक</u>** : ०१/११/२०२५